# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष १ ले. अंक १० वा. नवी मुंबई दिनांक १ ते ३० एप्रील २०१२ पाने १६ किंमत २० रूपये

# म.गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना



# सामान्य माणूस रिकामा
# अधिकाऱ्यांच्या खिशात खजिना

## माहिती अधिकार वापरा
## मनरेगातील चोरी थांबवा !

### ती जनता अमर आहे !



*माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !*

मासिक
# नागरिक अधिकार

**सुभाष बसवेकर**
● संपादक ●
**गणेश काजळे-पाटील**
●कार्यकारी संपादक●

**संपादक मंडळ /प्रतिनिधी**

**किरण मांजरेकर** (मुंबई)
**कु.शीतल कापूरे** (नवी मुंबई)
**राजेश बने** (रायगड)
**भगवान वाहूळे** (पूणे)
**राजेश ठाकूर** (नागपूर)
**प्रीतम यादव** (सातारा)
**अजित कोठारी** (जालना)
**देविदास चौथमल** (औरंगाबाद)

अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाहीसर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : **नागरिक अधिकार**
प्लॉट नं. ई-९६ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com
: web site :
google site swarajlokandolan
: Blog :
subhashbaswekar blog

## संपादकीय...........

## "चलो आज ही मरो , कहीं कल कफन मंहगा न हो जाये"

अर्थ संकल्पानंतर सरकारने पुन्हा रडायला सुरूवात केली आहे. परंतु सरकारचे हे अश्रू मगरीचे आहेत. आम्ही प्रयत्न करीत आहोत. लवकरच महागाई कमी होण्याची अर्थशास्त्रीय प्रक्रिया सुरू होईल. अशा बतावण्या शासन गेल्या काही वर्षात वेळोवेळी करीत आले आहे. विमान कंपन्यांना बेल आऊट पॅकेज देण्यासाठी घाई करणारे प्रणव बाबु सारखे मंत्री रेल्वे प्रवासाच्या तिकटदर वाढीचे समर्थन करतात तेव्हा या सरकारचा लोककल्याणकारी बुरखा फाडण्याच्या अगोदरच जर्जर होवून गळून पडलेला दिसत असून त्या आडचा विकृत व लूटारू चेहरा समोर आला आहे. गॅस व करोसीन वरील अनुदान तसेच शेतकऱ्यांना खतावर दिले जाणारे अनुदान याचे ही सरकार समोरील पोटदुखी आहे. गरीबांना काही कोटी द्यायचे म्हटले की हे सरकार रडते त्यासाठी समित्या, आयोग व सर्व्हे आणि नाना अटी व नियमांचे जंजाळ उभे करते. आणि कार्पोरेट लॉबीजसाठी अब्जावधीच्या फायद्याचे निर्णय मात्र एका फटक्यात कसे घेते ? हे सगळयांनाच माहित आहे. १०० दिवसात महागाई कमी करू असे आश्वासन आपल्या जाहिरनाम्यात घालणारे कॉंग्रेस व त्यांचे पंतप्रधान सत्ता येताच आमच्याकडे काय जादूची कांडी आहे काय ? असे म्हणतात तेव्हा जादूची कांडी नव्हती तर जाहिरनाम्यात खोटया थापा मारताच कशाला हा प्रश्न सामान्य माणसाने विचारला तर त्यात वावगे ते काय ?

सरकारी पातळीवर सर्वच मंत्रालयात व विविध योजनांच्या नावे भरमसाठ उधळपट्टी चालू आहे. दिल्लीतील प्रशासकीय बाबु आपल्या एका चहाची कपाची किंमत २५ रूपये लावून ते बील सामान्य माणसांच्या करातून भरीत आहेत. महाराष्ट पोलीसातील सुरक्षा रक्षकांच्या कमरेचा बेल्ट ची खरेदी २००० रूपयाला एक बेल्ट या प्रमाणे करण्यात आली. पोलीसांना दोन हजार रूपयांचा पट्टा आणि सर्व सामान्य नागरिकांच्या खिशाला चट्टा हे च शासनाचे धोरण आहे. सरकारी उधळपट्टी कमी करून देशाच्या पायाभूत विकासासाठी धोरणात्मक गुंतवणूक करणे, सामान्य माणसांच्या विकासाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविणे, शेतीमालावर प्रक्रिया, शिक्षण अशा महत्वाच्या ठिकाणी गुंतवणूक व परतावा कसा येईल असे नियोजन करणे अशी कामे करण्यापेक्षा सरकार मधील लोक खिसे भरण्याचे नियोजन करीत आहेत हे या देशाचे दुर्दैव होय.

दारिद्रयाने भरलेल्या महासागरात समृद्धीचं बेट फार काळ टिकून राहू शकत नाही.

# म.गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना



## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्राची वैशिष्टये

मजूरासाठी सोयीसवलती

१) गावापासून ५ किमीपेक्षा जास्त अंतरावर रोजगार दिल्यास १० टक्के जास्त मजूरी राज्यशासन मार्फत

२) रोजगार उपलब्ध न केल्यास दैनिक मजूरीच्या २५ टक्के बेरोजगार भत्ता

३) कामावर पिण्याचे पाणी, प्राथमिक उपचार पेटी, मजूरांच्या ६ वर्षाखालील लहान मुलांना सांभाळण्याची सोय

४)कामाच्या अंनुषंगाने मजूरास वा बरोबर आणलेल्या मुलास दुखापत झाल्यास सर्व रूग्णसेवा शासकीय खर्चाने व दैनिक मजूरीच्या ५० टक्केपर्यंत सानुग्रह रूग्ण भत्ता. वा मृत्यू आल्यास ५०,००० पर्यंत अनुदान

५) बॅकेत किंवा पोष्टात थेट मजूरी.कुटुंबातील स्त्रीच्या नावे वेगळे बँक किंवा पोष्ट खाते

चांगला वेळ घेवून वाईट काम करण्यापेक्षा खराब वेळेत चांगले काम करणे हीच खरी कसोटी आहे.

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्राची वैशिष्ट्ये

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्राखाली नोंदणीकृत ग्रामीण प्रत्येक प्रौढव्यक्तीस अकूशल रोजगाराचा हक्क कुटुंबनिहाय जॉब कार्ड

२) नोंदणीकृत कुटुंबाला वित्तीय किमान १०० दिवस केंद्रीय निधीतून अकूशल रोजगाराची हमी आवश्यक ज्यादा दिवसांसाठी राज्यनिधीतून अकूशल रोजगाराची हमी.

३) कायद्याच्या अंमलबजावणीची प्राथमिक जबाबदारी ग्रामपंचायतीची

४) प्रतिदिन मजूरीचे दर केंद्रशासन निश्चित करेल.

५) केंद्रशासनाने ठरविलेल्या दराप्रमाणे मजूरास मजूरी मिळेल.अशा प्रकारचे दरपत्रक राज्यशासन निश्चित करेल.कामाप्रमाणे दाम, स्त्री-पुरूष समान दर

६) काम केल्यानंतर जास्तीतजास्त १५ दिवसात मजूरी वाटप

७) कामासाठी नावनोंदणी केलेल्या मजूराने किमान १४ दिवस सलग काम करणे आवश्यक

८) एका ग्रामपंचायत हद्दीत काम सुरू करण्यासाठी किमान १० मजूर आवश्यक ही अट डोंगराळ भाग व वनीकरण कामासाठी शिथीलक्षम

९) मजूरीचे वाटप मजूराच्या बँक वा पोष्ट बचतखात्यात

१०) गावाच्या ५ किमी परिसरात रोजगार देणे.कोणत्याही परिस्थितीत पंचायत समिती क्षेत्राबाहेर नाही.

११)कामावर कंत्राटदार लावण्यास बंदी

१२) कामात किमान ६० टक्के भाग अकूशल तालुका व जिल्हा स्तरावर अकुशल - कूशलतेचा हिशोब ठेवता येईल.

१३)मजूरामार्फत करता येण्यासारख्या कामावर मशिनरी लावण्यास बंदी

१४) राज्यशासनास सल्ला देणारी महाराष्ट्र रोजगार हमी परिषद

१५) सर्व माहिती कामवार, ग्रामपंचायत व वेबसाईटवर उपलब्ध करून देणार

१६) कामाचे सामाजिक अंकेषण (सोशल ऑडिट) व पारदर्शकता

१७) तक्रार निवारण

मनात हुरहूर असते तेव्हा वेळ ही वेळकाढूपणा करते.मन विचारशुन्य असतं तेव्हा काळ ही गोठतो.

## आपल्या परिसरातील ग्रामपंचायती मार्फत राबविण्यात आलेल्या म.गांधी रोजगार हमी योजनांची माहिती अधिकारात माहिती मागविण्यासाठी नमूना

### माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

### (जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय,
---------------------

१) अर्जदारांचे नाव ------------------------------------------------

२) पत्ता : --------------------------------------------------------

३) माहितीचा विषय :- आपल्या कार्यक्षेत्रातील म.गांधी रोजगार हमी योजनेविषयीची माहिती मिळेणबाबत

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी( सन २०१० व सन २०११)

अ) म.गांधी रोजगार हमी योजनेमध्ये अकूशल कामाबद्दल प्रती व्यक्ती प्रती किती मजूरी मिळते.गावात किती लोकांना मजूरी मिळाली सन २०१० व २०११ मध्ये एकूण किती रूपये मजूरीचे वाटप झाले ? किती मजूरी देणे बाकी आहे.

ब) गावात जॉब कार्ड मिळालेल्या कुटुंबाचे जॉब कार्ड नंबर द्यावेत तसेच त्यांची कोणत्या बँकेत खाती काढली त्या बँकाची नावे व त्यांच्या नावावर बॅकेत कधी व किती मजूरी जमा झाला याचा तपशील द्यावा.

क) आपल्या गावात झालेल्या रोजगार हमी च्या कामाचे सोशल ॲडीट कधी झाले या सामाजिक अंकेषण अहवालाची सन २०१० व सन २०११ मधील प्रती द्याव्यात.

ड )मनरेगा अंतर्गत वैयक्तीक लाभांच्या योजनेतील नावाची मंजूरी ग्रामसभेत घेतली होती काय ? असल्यास ग्रामसभेचा तसा ठराव घेतल्याची प्रत मिळावी.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : -------------------
दिनांक : ----------------------

अर्जदाराची सही
(नाव -----------------)
मो.:

आयुष्यात बहूतांश वेळा संधी मोफत मिळते परंतु वेळेवर संधीच सोनं न करणं हे फार महागडं ठरू शकतं.

## आरटीआय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना एक आवाहन

# नागरिक अधिकार

हा अंक आपणास आवडला का ? प्रत्येक महिन्याला नवनवीन फ्रेश आणि उत्तमोत्तम माहिती आपल्याला घरपोच यावी असे मनापासून वाटते ना ?तर मग आपण विश्वासाने बिनधास्तपणे नागरिक अधिकार परिवाराचे सदस्य बना.

## आपण या अंकाचे वर्गणीदार व्हा !

**वार्षिक : २४०रूपये. पंचवार्षिक : १००० रूपये आजीवन :५,०००रूपये**

आपले डी.डी./ चेक **नागरिक अधिकार** या नावाने काढून संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई.९६,सेक्टर -१२ खारघर, नवी मुंबई ४१०२१० या पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवावेत किंवा तुमच्या शहरातील जवळच्या स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून **20102640492** या नंबरच्या खात्यावर सुभाष बसवेकर (संपादक नागरिक अधिकार पनवेल शाखा) या नावाने पैसे भरू शकता.बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर नियमित अंक पाठवला जाईल.

---

## आरटीआय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना सभासद होण्यासाठी आवाहन

जनजागृती ! संरक्षण ! ! संघर्ष ! ! !

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार व जागरूक नागरिकांकडून शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्देसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१० या पत्यावर पाठवावा.

अडचणीच्या आस-पास,आत-बाहेर कोठेतरी संधी पहूडलेली असते.ती डोळसपणे शोधून मार्ग काढायला हवा.

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई-४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ----------------------------------------------------

पत्ता :---------------------------------------------------

---------------------------------- पीनकोड

मोबाईल :

ई मेल :----------------------

शिक्षण : ------------------------ जन्मदिनांक --------------------------------

व्यवसाय :---------------------- येणाऱ्या भाषा: --------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: ----------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ----------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /---------------------------------------

मी गंभीरपूर्वक व विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी सभासद फी व नागरिक अधिकार मासिकाची वार्षिक वर्गणी असे एकत्रीत ३०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व मासिकाचे अंक मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावे.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीन. आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : -------------- सही

सभासद कोड नंबर

### कार्यालयीन उपयोगासाठी

मासिक वर्गणी नंबर

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक / / २०१२ मुदत समाप्तीचा दिनांक / / २०१३
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद -------------------------------- आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- मासिकांचा अंक पाठविण्यास सुरूवात केलेला महिना व वर्ष ------------- / २०१२
- मासिक वर्गणी व सभासद फीस रूपये मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली
- शेरा -----------------------------------------------------------------------------


रस्ता चांगला आहे की नाही हे पाहण्या अगोदर तो आपल्याला कोठे घेऊन जाईल हे पाहिले पाहिजे

व्यासपीठ

# सामान्य माणूस रिकामा

# अधिकाऱ्यांच्या खिशात खजाना !




## नांदेड चे मोतीराम काळे यांनी बाहेर काढलेला रोहयो घोटाळा !

नांदेड जिल्हयातील लोहा येथील माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे कार्यकर्ते श्री.मोतीराम गयबु काळे यांनी रोजगार हमी योजनातील करोडो रूपयाचा धान्य कूपन घोटाळा उघडकीस आणला.या धान्य कूपन घोटाळयात ६१ अधिकारी व कर्मचारी यांची चौकशीचा फार्स झाला.मजूरांची कष्टाची कमाई या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी आपल्या खिशात भरली.चौकशीचे कागदी घोडे अजूनही नाचविले जात आहेत.परंतु काळे यांच्या प्रयत्नामुळे भ्रष्ट अधिकाऱ्यावर चाप बसला आहे.काळे सारखे जिद्दी कार्यकर्ते लढतात म्हणून सामान्य मजूरांना दिलासा मिळतो

अश्रू गाळल्यामुळे फार तर सहानुभूती मिळेल,परंतु घाम गाळल्यामुळे हक्काची भाकर मिळते.

ओळख कायद्याची

# म.गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदा

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना -महाराष्ट्र
अंतर्गत जबाबदाऱ्या

१) प्रमुख जबाबदारी-पंचायत राज संस्थाची त्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामसभा ग्रामपंचायतीच्या जबाबदाऱ्या

## ग्रामपंचायतीच्या जबाबदाऱ्या

१) कुटुंबाची नोंदणी जॉब कार्ड देणे
२) रोजगार उपलब्ध करणे
३) ग्रामसभेच्या माध्यमातून रोजगाराच्या गरजेचा पूर्व वार्षिक अंदाज घेणे त्याचप्रमाणे नियोजन आरखडा व कामाचे प्राधान्य ठरविणे
४) सामाजिक अंकेषण (Social Audit) व पारदर्शकता ठेवणे
५) दक्षता समिती
६) रोजगार दिवस

## पंचायत समितीच्या जबाबदाऱ्या

समिती क्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतीचे समन्वयन व कामाचे नियोजन

## जिल्हा परिषदेच्या जबाबदाऱ्या

पंचायत राज संस्थांना त्यांची कायदेशीर जबाबदारी पार पाडण्यास मदत करणारे अधिकारी

फुले कुस्करली जातात तेव्हाही सुगंधच देतात, ती खरी क्षमा होय.

## जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) जबाबदारी

योजनांचे जिल्हाप्रमुख

१)संयनियंत्रण २)नियोजन ३) निधीवाटप ४) प्रशासकीय मान्यता

५)तपासणी ६)माहीती समन्वयक

## ७)सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (प्रमुख कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद)

जिल्हा कार्यक्रम समन्वयकास मदत

२)नियोजन ३) निधीवाटप ४) प्रशासकीय मान्यता

५)तपासणी ६)माहीती समन्वयक

## कार्यक्रम अधिकारी (तहसीलदार)

प्रशासकीय मान्यता तहसीलमधील नियोजन

समन्वय वेळेवर मजूरी वाटप सोशल ऑडीट

तक्रार निवारण

जिल्हा कार्यक्रम समन्वयकाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास ते सूचीत करतील त याप्रमाणे कार्य करणे

सहकार्यक्रम अधिकारी (गट विकास अधिकारी)

प्रशासकीय मान्यता पंचायत समिती कार्यक्षेत्रात मग्रारोहयो संदर्भात सह जिल्हा कार्यक्रम समन्वयकास त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास ते सूचित करतील त्या कार्य करणे

# दिल्लीतील महत्वाचे पत्ते व नंबर

## कम्प्ट्रोलर अॅन्ड ऑडीटर जनरल ऑफ इंडिया

१० बहादूर शहा जफर मार्ग ,नवी दिल्ली
विनोद राय (कम्प्टोलर)
फोन : ०११ २३२३६२०४
फॅक्स :२३२३३६१८

## मुख्य न्यायाधिश सर्वोच्च न्यायालय ,

टिळक मार्ग,नवी दिल्ली
फोन :०११ २३३८८९२२
फॅक्स : ०११ २३३८३७९२

## राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग

लोकनायक भवन खान मार्केट नवी दिल्ली
मोहम्मद शफी कुरेशी
चेअरमन
फोन : ०११ २४६९०५९२

## नियोजन आयोग

योजना भवन संसद मार्ग
नवी दिल्ली
फोन : ०११ २३०९६६२०

चेअरमन

## केंद्रिय दक्षता आयोग

सतर्कता भवन,
ब्लॉक ए,जीओपी कॉम्प्लेक्स
आय.एन.ए.नवी दिल्ली
फोन :०११ २४६५१०२०
फॅक्स ०११ २४६५१००९

## केंद्रिय निवडणूक आयोग

निर्वाचन सदन,आशोका रोड
नवी दिल्ली
फोन : ०११ ३७७१३६८९
फॅक्स :०११३७७१७०२७

## केंद्रीय मुख्य माहिती आयुक्त

ब्लॉक नं.४ ,५ वा मजला, ओल्ड जवाहरलाल नेहरू युनिव्हर्ससीटी कॅम्पस् ,नवी दिल्ली
फोन : ०११ २६७१७३५२ /५३ २६१६७९३२ २६१६२२९०

आपल्याला व्यक्तीशः ओळखणारे खूप असतात,पण समजून घेणारे फार कमी असतात

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ

## मासिक नागरिक अधिकार

## स्वराज बहुउद्देशीय संस्थेच्या

## सर्व उपक्रमांची, कार्यक्रमांची माहिती

## आता थेट इंटरनेटवरही उपलब्ध

## गुगल सर्च करा

rtimahasangh.weebly.com

google site swarajlokabhiyan

http://subhashbaswekar.blogspot.in/

## नागरिक अधिकार चे ताजे अंक वाचा माहिती अधिकार महासंघ महाराष्ट्रातील सभासदांची व कार्यकर्त्यांची सर्व इंत्यूभूत माहिती पहा.

# आता थेट इंटरनेटवर

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ आणि नागरिक अधिकार मासिक या चळवळीशी जोडल्या गेलेल्या सर्व कार्यकर्त्यांना एक आनंदाची बातमी अशी की आता आपला महासंघ इंटरनेटच्या जगाशी ऑनलाईन जोडला गेला आहे.माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या दोन वेबसाईट ऑनलाईन झाल्या आहेत.गुगल मध्ये वेबसाईटचा पत्ता टाईप करून टाकताच ही वेबसाईट ओपन होवून कार्यकर्त्यांसाठी अनेक संदर्भ असलेली माहिती,जसे ऑन लाईन फार्म डावूनलोड करून घेणे, ऑनलाईन फार्म भरून पाठविणे,नागरिक अधिकार मासिकांचे अंक पीडीएफ व गुगल डॉक्सवर वाचणे व डावूनलोड करून घेणे अशी अनेक कामे सोप्या पद्धतीने करता येणार आहेत.उत्तरोत्तर ही बेवसाईट अधिक संदर्भपूर्ण व माहितीने परिपूर्ण अशी होत जाईल यात शंकाच नाही.

आपले कार्यकर्ते सर्व दूर महाराष्ट्रभर ग्रामीण भागात राहणारेही आहेत.अनेकदा नागरिक अधिकार चे अंक पोष्टाने पोहचत नसल्याच्या अनेक तक्रारी आमच्यापर्यंत येतात.ज्याना अंक मिळत नाहीत त्यांना आम्ही त्वरीत दुसरे अंक पोष्ट करतो. तरी आता सर्वच अंक वेबसाईटवर अपलोड केले जातात त्यामुळे कार्यकर्त्यांना ते आपल्या वेबसाईटवर जावून पाहता येतील तसेच डावूनलोड करून घेता येतील तरीही आता गावोगाव ग्रामपंचायती पर्यंत इंटरनेट पोहचलेले आहे.अनेकांकडील मोबाईल मध्येही गुगल सेवा असते.तालुका स्तरावरील बहूतांश शहरात आता सायबर कॅफे आहेत.याचा योग्य उपयोग करून घेवून आपला वेळ वाचवता येईल तसेच अधिक खात्रीने आपल्याला आपल्या सेवेचा उपयोग करून घेता येईल.तरी सर्वांनी विनंती आहे की त्यांना वेबसाईट भेट देत राहावी

काय व किती पाहिजे याचा शेवट दु:खात होतो.जे मिळाले ते मिळाले याचा शेवट आनंदात होतो.

# ग्रामपंचायत कार्यालयातील म.गांधी रोजगार हमी योजनाच्या कागदपत्राची पाहणी व लेखी माहितीसाठी नमुना अर्ज

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

ग्रामपंचायत कार्यालय,

---------------------

१) अर्जदारांचे नाव -----------------------------------------------

२) पत्ता : ---------------------------------------------------------

१) आपल्या ग्रामपंचायत कार्य क्षेत्रात म.गांधी रोजगार हमी योजनेचे किती जॉब कार्ड धारक कुटुंबे आहेत.कुटुंबाची यादी द्यावी.किती महिलांच्या नावे बँक व पोष्ट खाती आहेत याची यादी द्यावी.

२) आपल्या ग्रामपंचायत कार्य क्षेत्रात म.गांधी रोजगार हमी योजनेची सन २०११ व सन २०१२ या वर्षात एकूण किती कामे मंजूर झाली ?कामाची यादी द्यावी.काम सुरू झाल्याचा संपल्याचा दिनांक आदी तपशील द्यावा.

३)काम सार्वजनिक विकासाचे होते की,शेततळी,फळबागा लागवड आदी प्रकारचे खासगी स्तरावरील कामे रोजगार हमी योजनेतून पूर्ण झाली आहेत काय ?

४) खासगी स्तरावरील कामे मंजूर करण्यापूर्वी ग्रामसभेत सदर कामाची मान्यता घेतलेल्या ग्रामसभेच्या ठरावाच्या प्रती द्याव्यात.

५) म.गांधी रोजगार हमी योजनेतील ग्रामपंचायतीकडील सर्व कागदपत्रे जसे रोकडवही,(कॅश बूक) लेजर बुक, बँक पासबूक रेकार्ड नोंदवही.साठा नोंदवही (स्टॉक रजिस्टर) व्हाऊचर,करारनामे, हजेरी पत्रके, मोजमाप पुस्तिका आदी कागदपत्रे पाहणी व निरिक्षण करण्यासाठी दिनांक व वेळ लेखी कळवावा

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिशः माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : -------------------

दिनांक : ---------------------

अर्जदाराची सही

(नाव -----------------)

मो.:

संधी निर्माण करणारा हुशार असतो पण संधीचा फायदा घेणारा शहाणा असतो.

# म.रोजगार हमी योजना यांच्या गट विकास अधिकारी / तहसीलदार स्तरावरील माहिती मिळणेबाबत

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
## (जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती आधिकारी
गट विकास अधिकारी /तहसीलदार
ता.---------------जि---------------

१) अर्जदारांचे नाव ------------------------------------------

२) पत्ता : -----------------------------------------------

३) माहितीचा विषय : आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील मं.गांधी रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणी विषयीची माहिती मिळणेबाबत

अ) आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०११ व सन २०१२ मध्ये आज तारखेपर्यंत रोजगार आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०११ व सन २०१२ मध्ये आज तारखेपर्यंत अंतर्गत काम मंजूर झाली ? किती कामे सुरू झाली ? किती कामे पूर्ण झाली ? यादी देणे

ब) आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०११ व सन २०१२ मध्ये आज तारखेपर्यंत किती मजूरांना किती मजूरी मिळाली ? कामाची मागणी कररूनही कामे न दिल्याने किती मजूरांना मजूरी भरपाई भत्ता देण्यात आला सर्व कार्यक्षेत्रातील मजूराचे नाव मिळालेला भरपाई भत्ता अशी यादी द्यावी.

क) मं.गांधी रोजगार हमी योजनेच्या कामाच्या ठिकाणी निवारा शेड,पाळणाघर व अन्य सुविधा चालविण्याचे तालुकास्तरावरील काम करणाऱ्या ठेकेदारांची नावे व त्यांना सन २०११-२०१२ मध्ये देय रक्कमेचे व दिलेल्या रककमेचा तपशील द्यावा

ड ) २०११ व २०१२ मध्ये आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मं.गांधी रोजगार हमी योजनेत मजूरी वेळेवर मिळाली नसल्याच्या एकूण किती तक्रारी आल्या व संबधीत तक्रारीचा निपटारा कधी व केव्हा व कोणी केला याचा तपशील द्यावा

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------ अर्जदाराची सही

दिनांक : -------------------- (नाव ----------------)

मो.:

जे मनात साठवता तेच बाहेर येते.तेव्हा चिंतनाच्या कूपीत सद्‌गुणाचं अत्तर कसं भरायचं ते शिका.

# जि.प.शाळेतील व शासकीय मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील सर्वशिक्षा अभियान व अन्य शासकीय शालेय योजनांची माहिती मागविण्यासाठी अर्जाचा नमुना

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
## (जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

जिल्हाधिकारी कार्यालय

--------------------

१) अर्जदारांचे नाव --------------------------------------------

२) पत्ता : ---------------------------------------------------

३) माहितीचा विषय : मं गांधी रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीविषयी ची जिल्हा स्तरावरील माहिती मिळणेबाबत(२०१०-२०११)

अ) आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०११ व सन २०१२ मध्ये आज तारखेपर्यंत रोजगार आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०११ व सन २०१२ मध्ये आज तारखेपर्यंत किती कामाला प्रशासकीय मान्यता दिंली ? किती कामे सुरू झाली ? किती कामे पूर्ण झाली ? यादी देणे

ब) आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०११ व सन २०१२ मध्ये आज तारखेपर्यंत किती मजूरांना किती मजूरी मिळाली ? कामाची मागणी कररूनही कामे न दिल्याने किती मजूरांना मजूरी भरपाई भत्ता देण्यात आला सर्व कार्यक्षेत्रातील मजूराचे नाव मिळालेला भरपाई भत्ता अशी यादी द्यावी.

क) आपल्या कार्यक्षेत्रातील किती साईटवर कोणते अधिकारी तपासणी अधिकारी म्हणून गेले. मागील तीन महिन्यात किंवा शेवटच्या वेळी त्यानी कामाच्या ठिकाणी जावून तपासणी केलेले अहवालाच्या प्रती द्याव्यात.

ड ) २०११ व २०१२ मध्ये आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मं.गांधी रोजगार हमी योजनेत मजूरी वेळेवर मिळाली नसल्याच्या एकूण किती तक्रारी आल्या व संबधीत तक्रारीचा निपटारा कधी व केव्हा व कोणी केला याचा तपशील द्यावा.कामाच्या ठिकाणी अपघात झालेल्या किती मजूरांना अपघात भरपाई देण्यात आली.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिशः माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------ अर्जदाराची सही

दिनांक : -------------------- (नाव ----------------)

मो.:

शेवटचे पान ..

प्रेरणा



# ती जनता अमर आहे !

जनतेच्या पोटामध्ये आग आहे,आग आहे
जनतेच्या डोळ्यामध्ये शंकराचा राग आहे

जनतेच्या ऐक्यामध्ये लाव्हाची लाट आहे,
जनतेच्या पायापुढे प्रकाशाची वाट आहे

जनतेच्या हृदयामध्ये अन्यायाची कळ आहे,
जनतेच्या बाहूमध्ये सागराचे बळ आहे.

जनतेच्या ऐच्छेमध्ये नियतीचा नेट आहे,
जनतेच्या हातामध्ये भविष्याची भेट आहे.

जनतेच्या नसांमध्ये लाल-लाल रक्त आहे,
जनतेच्या सत्तेखाली पृथ्वीचे तख्त आहे.

जनतेच्या मुक्तीसाठी अजून एक समर आहे,
आणि जिचा आत्मा एक ती जनता अमर आहे.

- विंदा करंदीकर

प्रति,

पोस्ट परवाना No.G/NMD/128/2012-14

पाठविणार

पत्ता: **नागरिक अधिकार**
फ्लाट नं. ई-१६, सेक्टर -१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो ९२२३५१६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले.
रजि नं. MAHMAR/2011/40781